# भूमिगत मेट्रोच्या पुढील टप्प्याची तयारी

## शीतलादेवी, सिद्धिविनायक स्थानके लवकरच

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील सर्वाधिक लांबीच्या भूमिगत मेट्रोचा पहिला टप्पा प्रवाशांसाठी सुरू होण्यास विलंब झाला असताना, दुसरीकडे आता पुढील टप्प्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. याअंतर्गत ही मेट्रो उभी करणाऱ्या कंपनीच्या उच्चाधिकाऱ्यांनी नुकताच दोन स्थानकांच्या उभारणीचा आढावा घेतला.



'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' या नावे ओळखली जाणारी मेट्रो-३ ही ३३ किलोमीटरची राज्यातील सर्वांत लांब भूमिगत मेट्रो मार्गिका मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) उभी होत आहे. मार्गिकेचा २७पैकी १० स्थानकांचा पहिला टप्पा सुरू होण्याच्या बेतात आहे. त्यातील डब्यांच्या चाचण्या झाल्या असून, सिग्नल यंत्रणेच्या चाचण्या आता सुरू आहेत. मात्र या पहिल्या टप्प्याला सहा महिन्यांहून अधिक विलंब झाला आहे. या स्थितीत 'एमएमआरसी'ने मात्र पुढील टप्प्यातील पाहणी जोमाने सुरू केली आहे.

मार्गिकेचा पहिला टप्पा आरे (सारीपूतनगर) ते बीकेसी (प्राप्तिकर कार्यालय) असा असेल, तर दुसरा टप्पा धारावी ते कफ परेड असा असेल. या दुसऱ्या टप्प्यात शीतलादेवी मंदिर व सिद्धिविनायक मंदिर, या दोन स्थानकांचा समावेश आहे. यापैकी सिद्धिविनायक मंदिर हे स्थानक 'मिनी हब'प्रमाणे असेल. त्याद्वारे प्रभादेवीच्या सुप्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिरातदेखील थेट प्रवेश मिळू शकेल, अशी संरचना केली जात आहे. त्यामुळेच हे स्थानक महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर 'एमएमआरसी'च्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे, संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता, संचालक (प्रणाली) राजीव यांच्यासह अन्य उच्चाधिकाऱ्यांनी या स्थानकांना भेट दिली. त्यादरम्यान तेथील बांधकामासह प्रणालीशी निगडित कामांचा आढावा घेण्यात आला.

या मेट्रो मार्गिकेत सध्या कार्यान्वित असलेल्या गुंदवली ते अंधेरी पश्चिम, या मेट्रो-२अ व मेट्रो-७ मार्गिकेप्रमाणे 'प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्स' असतील. हे दरवाजे फलाटाला लागून असून, ज्यावेळी गाडी येते केवळ त्याचवेळी ते उघडतील. मात्र मेट्रो-२अ व मेट्रो-७मधील दरवाजे हे गाडीच्या निम्म्या उंचीवर आहेत. मेट्रो-३मध्ये हे दरवाजे पूर्ण असतील. यामुळे गाडी फलाटावर नसताना फलाट व रूळ मार्गिका यांच्यात एकप्रकारे काचेची भिंत असेल. शीतलादेवी मंदिर व सिद्धिविनायक मंदिर स्थानकाबाबत 'प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्स'चे काम पूर्ण झाल्याचे यावेळी दिसले.